अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# नीतिमूल्यांसाठी पुढाकार हे प्रागतिकतेचे लक्षण

पृथ्वीवर एकच मनुष्य राहत असता तर त्याला नियम,शिस्त,कायदा अशापैकी कशाचीच गरज पडली नसती.म्हणजेच तो एकटा असल्याने त्याला नियंत्रणात ठेवण्याचा मुद्दाच आला नसता. परंतु जेव्हा हाच मनुष्य समाज म्हणून वावरू लागतो किंवा समाजात वस्ती करतो तेव्हा त्याला नियंत्रणात ठेवण्याची गरज पडते. समाज, राष्ट्र, जग याचा त्याचा जास्त विस्तार होईल तेवढी त्याला नियंत्रणात ठेवण्याची जबाबदारी वाढते. कारण ही मनुष्यसंख्या किंवा लोकसंख्या जेवढी मोठी होत जाईल तेवढ्या मनुष्याच्या गरजा वाढतात. अपेक्षा वाढतात आणि त्यातूनच त्याचा स्वैराचारही वाढण्याची शक्यता असते. म्हणजेच एक व्यक्ती असेपर्यंत नितीनियमांची फार गरज भासत नाही. जीवनमूल्यांचीही फारशी आवश्यकता वाटत नाही. मात्र त्या अनेक व्यक्तींचा मिळून जेव्हा समाज बनतो त्यावेळेला या सर्व बाबी म्हणजे नितीनियम जीवनमूल्ये अनिवार्य ठरतात. ती जर नसती तर व्यक्तीला समाज म्हणून वावरणे मोठे कठीण होईल. समाजात अराजक निर्माण होऊ शकेल. मग हे नितीनियम परंपरेनुसार जरी आलेले असले तरी काळानुरूप त्यात थोडेफार बदल केले पाहिजेत. मात्र या नीतीनियमांचा आधार हा सामाजिक जीवनमूल्ये असाच राहिला पाहिजे. आज कायदे काय कमी आहेत. जशी परिस्थिती बदलते जशी समाजाची गरज वाढते. तसे नवे कायदेही तयार होतच राहतात; परंतु हे कायदे पाळण्यासाठीसुध्दा एक नितीमूल्य हवे असते. तेच जर नसेल तर कितीही कायदे केले तरी त्याचा प्रभाव राहत नाही. कारण कायद्याविषयीसुध्दा एक प्रकारचा धाक वाटणे हा सामाजिक जीवनमूल्याचाच धाक ठरतो. आज परिस्थिती काय आहे. भरमसाट कायदे आहेत. त्याची निर्मिती करणाऱ्या संसद, विधिमंडळ यासारख्या संस्था आहेत. कायद्याची अंमलबजावणी करण्याकरता कार्यपालिका म्हणजेच प्रशासन, पोलीस या यंत्रणा आहेत आणि त्याच कायद्याचा गैरवापर रोखण्याकरता न्यायालयेसुध्दा आहेत. तरीदेखील एकूण समाजामध्ये नितीमत्तेचा आणि जीवनमूल्यांचा वेगाने ऱ्हास होत आहे. त्याचे परिणाम आणि पडसाद घराघरात जाणवतातच. त्याशिवाय समाजातला स्वच्छंदीपणाही वाढताना दिसतो आहे. गेल्या काही दिवसांपासून स्त्री अत्याचाराच्या वाढणाऱ्या घटना हा अत्यंत किंवा तितकाच ज्वलंत जीवनमूल्यांचा ऱ्हास दर्शवणाऱ्या म्हणाव्या लागतील. अशावेळी त्यामागची कारणेदेखील शोधली पाहिजेत. वरवरचे उपाय करण्याऐवजी या समस्येच्या मुळावर घाव घालणे जास्त योग्य ठरते. म्हणजे मग अशा विकृतीची विषवल्ली फोफावणार नाही याची दक्षता घेता येते.

## असा आग्रह धरण्यात चूक काय?

समाजातल्या वाढत्या स्वच्छंदीपणाची ,स्वैराचाराची अनेक उदाहरणे रोज घडत असतात. अगदी अलिकडची काही उदाहरणे त्याची साक्ष देणारी आहेत. याकरताच समाज किंवा सरकारने हा स्वैराचार रोखण्याविषयी ज्या काही उपाययोजना दिसून येतात ज्या करण्यासाठी समाजातल्या काही घटकांचा रोष पत्करावा लागतो. या उपाययोजना म्हणजे मागासलेपणा आहे. अशा प्रकारचा टेंभा मिरवणाऱ्या तथाकथित आधुनिकतावादी किंवा तथाकथित बुध्दिवंतांचा समाचारही घ्यावा लागतो. कारण पाश्चात्यांच्या जीवनशैलीवर भारतात बांडगुळाप्रमाणे जगणारी ही जमात भारताच्या संस्कृतीला नख लावणाऱ्या गोष्टींना मागास ठरवून आपला स्वार्थ साधून घेत आहेत. आज काही ठिकाणी अगदी छोट्या प्रमाणात समाजातली नितीमत्ता टिकवण्यासाठी हालचाल सुरु झालेली दिसते.याचे अलिकडचे उदाहरण म्हणजे केरळचे मुख्यमंत्री ओमान चंडी यांनी राज्यातले सगळे बार हळूहळू बंद करून राज्याला दारुमुक्त करण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. तर इकडे गोव्यातल्या समुद्रकिनाऱ्यावर उघडपणे बिकीनी घालून समुद्र स्नान करणाऱ्यांसाठी ठरावीक जागा आरक्षित करण्याची नवी कल्पना पुढे आली आहे. त्याला त्यांनी बिकीनी बीच असे नाव देण्याचे ठरवले आहे. यासाठी स्वतंत्र शुल्क आकारण्याची सूचना पुढे आली आहे. त्याशिवाय गुजरातमध्ये शाळकरी विद्यार्थिनींनी सर्वसाधारणपणे कशा प्रकारचा पोषाख करावा याविषयी आवाहन करणारे काही फलक ठिकठिकाणी लागलेले दिसून येत आहेत. तामिळनाडूत चेन्नईतल्या एका शाळेत शाळांमध्ये मोबाईल वापरावर पूर्ण बंदी घातली गेली आहे. याबरोबरच पुढील काही दिवसात प्रकाशित होणाऱ्या आमीर खानच्या 'पीके' या चित्रपटातल्या अश्लील दृश्यांबद्दल समाजातूनच आक्षेप घेतले गेले आहेत. या सगळ्या गोष्टी सरकारी पातळीवर आणि सामाजिक पातळीवर नीतीमूल्यांच्या आवश्यकतेचा जागर करणाऱ्या ठरतात. त्या त्या ठिकाणी सरकारने किंवा लोकांनी जर पुढाकार घेतला असेल तर समाजात काही गोष्टी सभ्यता टिकवण्यासाठी गरजेच्या आहेत. यासाठी पुढाकार घेतला जात असेल तर त्याचे स्वागत केले पाहिजे, अशी गरज वाटणे आणि त्यासाठी पुढाकार घेऊन जागृती होणे हे समाजातल्या जाणतेपणाचे लक्षण ठरते. त्याला कोणी मागासलेपणा म्हणत असेल तर त्यांच्या भोगलोलुप आणि वासनांध विकृतीचा निषेधच केलेला बरा.

## आधुनिकतेपेक्षा प्रागतिकपणा महत्त्वाचा

यावरून सामाजिक जीवनमूल्यांसाठी काही नैतिक बंधनांची समाजाला किंवा सरकारला गरज भासू लागली आहे. हे या घटनांवरून सिध्द होते.आधुनिकतेचा बुरखा पांघरून विकृतीला गोंजारणाऱ्यांनी थोडे आत्मपरीक्षण केले पाहिजे, सगळ्याच गोष्टी पाश्चात्य जीवनशैलीप्रमाणे भारतात आणल्या म्हणजेच आपण आधुनिक ठरतो. अशा भंपकबाजीचा प्रचार त्यांनी करू नये. यातून ते स्वत: ची फसवणूक तर करतातच, परंतु समाजातल्या आगामी पिढ्यांना विकृतीचा मार्ग दाखवत असतात. भारतासारख्या प्राचीन संस्कृतीप्रधान देशाने आधुनिकतेला कधीच नाकारलेले नाही. काळानुरूप त्यात अनेक सुधारणा झाल्या. यापूर्वीही होत राहतील. परंतु वाटेल तसे मद्यप्राशन, मोबाईल इंटरनेटचा पराकोटीचा गैरवापर किंवा अभिरुचीहीन अंगवस्त्रे घालून विचित्रपणाचा आग्रह जेव्हा धरला जातो. तेव्हा त्याला रोखणे भारतासारख्या देशाला आवश्यक ठरते. एका विशिष्ट मर्यादेपर्यंत आधुनिकतेखालचा हा बाजारूपणा सहन करता येईल. पण त्यातून जर धिंगाणा आणि बाजारमस्तीच वाढीला लागणे हा समाजालाच नियंत्रणहीन करण्याचा मार्ग ठरतो. आम्ही तर नेहमी असे म्हणतो की, काळ कितीही बदलला कितीही नव्या प्रकारचे विज्ञान आणि तंत्रज्ञान आले तरी माणसाला आपले माणूसपण टिकवावे लागेल. त्याला जनावरांसारखा स्वच्छंदीपणा करता येणार नाही. मनुष्याला मिळालेल्या बुध्दी आणि गुणांचा उपयोग त्याने समाजाच्या मांगल्यासाठीच केला पाहिजे. याचा आग्रह धरणे किंवा त्यासाठी पुढाकार घेणे हे आधुनिकतेपेक्षाही अधिक प्रागतिकपणाचे आणि पुरुषार्थाचे लक्षण ठरते.